# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-२१२ दिनांक-३१/०५/२०२४

## कळंब बीच रोड बुधाजी स्टॉप, नालासोपारा पश्चिम येथे कारवाई करुन अवैध वेश्याव्यवसाय करवुन घेणाऱ्या पुरुष आरोपीस अटक करुन दोन पिडीत महीलांची सुटका करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा यांना यश

अर्नाळा पोलीस ठाणे हद्दीतील **कळंब बीच रोड,दामोदर फार्म हाउस जवळ, बुधाजी स्टॉप, नालासोपारा पश्चिम,** ता-वसई जि.पालघर याठिकाणी एक पुरुष वेश्यादलाल हा वेश्यागमनाकरीता कळंब बीच रोड दामोदर फार्म हाउस जवळ नालासोपारा पश्चिम येथे मुली पुरविणार असल्याची गोपनीय माहीती अनैतीक मानवी वाहतुक शाखेचे पोलीस निरीक्षक सौरभी पवार मॅडम यांना मिळाल्यावरुन पोलीस पथक, बोगस गिऱ्हाईक व दोन पंच तसेच असे सदर ठिकाणी जावुन दि.३०/०५/२०२४ रोजी कारवाई करुन पुरुष वेश्यादलाल **राहुल अमीन अकबर अली सद्दर यास** अटक करुन दोन महीला पिडीतांची सुटका करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षास यश आलेले आहे.

सदर बाबत थोडक्यात हकीकत अशी कि, बोगस गि-हाईक तयार करुन त्यास नमुद वेश्यादलाल याचेकडे मिळालेल्या माहीतीच्या आधारे **वेश्यादलाल राहुल याचे** मोबाईल क्रमांकावर संपर्क करुन वेश्यागमनासाठी मुलीची मागणी केली असता त्याने सांगितले की, मी एका मुलीचे ५०००/- रु. घेतो .आपणास कबुल असेल तर **कळंब बीच रोड,दामोदर फार्म हाउस जवळ, बुधाजी स्टॉप** नालासोपारा पश्चिम येथे येण्यास सांगितल्यावर बोगस गि-हाईक याने त्यास होकार दिला. त्यानंतर बोगस गि-हाईक हा पंचासह **कळंब बीच रोड,दामोदर फार्म हाउस जवळ, बुधाजी स्टॉप** येथे गेले असता वेश्यादलाल **राहुल अमीन अकबर अली सद्दर याने** बोगस गिऱ्हाईकास दोन महीला दाखवल्या व त्यामधुन तुम्ही पसंद करा व माझे कमिशन व वेश्यागमनाचा मोबदला म्हणुन मला ठरल्याप्रमाणे पैसे दया असे सांगितल्यावर बोगस गिऱ्हाईक याने पोनि/पवार मॅडम यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे एक महीला पसंद करुन छापा पंचनाम्यातील ठरल्याप्रमाणे त्यास पैसे दिले असता बोगस गिऱ्हाईक याने पोलीस पथकास कन्फरमेशन इशारा दिला असता दोन पंचासह सदर ठिकाणी जावून छापा टाकला त्यामध्ये एक पुरुष दलाल आरोपीत नामे **राहुल अमीन अकबर अली सद्दर** वय २८ वर्षे यास ताब्यात घेतले. व दोन महीला पिडीत यांची वेश्याव्यवसाया पासुन सुटका केली आहे.

यातील वेश्यादलाल नामे **राहुल अमीन अकबर अली सद्दर वय २८ वर्षे रा.ऑरेंज हॉस्पिटल जवळ पडीक बिल्डींग मध्ये, भाईंदर पूर्व जि.ठाणे, मुळ रा.ग्राम-सागदा पोस्ट जादकपूर, पोस्टे –स्वरुपनगर जि.उत्तरचोबीस परगाना,पश्चिम बंगाल याने** पिडीत महीलांना पैशाचे आमिष दाखवुन वेगवेगळया ग्राहकांना बोलावुन त्यांचेकडुन पैसे घेवुन पिडीत महीला यांना वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडले व वेश्यागमनाचा मोबदला व कमीशन मिळुन असे एकुण एका महीलेचे ५०००/-रु. घेतो व त्यातील ५००/- रुपये पिडीत महीलांना देत असतो.

तरी सदर पिडीत महीला यांची वेश्याव्यवसायाच्या दलदलीतून सुटका करुन नमूद पुरुष दलाल आरोपीत यास अटक करुन अर्नाळा पोलीस ठाणे गु.रजि.नं.२१०/२०२४ भादविस कलम ३७०(१) सह अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४,५ प्रमाणे आरोपीत **राहुल अमीन अकबर अली सद्दर वय २८ वर्षे याचेवर** गुन्हा दाखल केला आहे.

सदरची कारवाई ही मा.पोलीस उपआयुक्त श्री अविनाश अंबुरे (गुन्हे), सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री मदन बल्लाळ यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा युनिटचे पोनि/सौरभी पवार व सफौ. पवार, गवई, म.पो.हवा. डोईफोडे पो.हवा. शेटये, चा.पो.हवा. पागी, म.पो.हवा. तिवले, पो.हवा. शिंदे, म.पो.अं. पाटील, सर्व नेम.अनै.मा.वा.प्र.कक्ष नालासोपारा यांनी केली आहे.